REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 1 | OCTOBER - 2018

# अटलबिहारी वाजपेयी यांच्या योगदानाचा अभ्यास

**श्री. राजकुमार तुकाराम राठोड**
**सहशिक्षक एम.ए.एम.एड् सेट (शिक्षणशास्त्र)जि.प.प्रा.शा.लऊळ क्र.१ ता.माजलगाव जि.बीड महाराष्ट्र.**

**सारांश :-**

अटलबिहारी वाजपेयींच्या योगदानाचा अभ्यास केला आहे. अटलबिहारी वाजपेयी यांनी केलेले कार्य परमाणू परीक्षण विस्फोट पोखरण II राजस्थान, दिल्ली ते लाहोर बससेवा, कारगिल युध्द, इंडियन एअरलाईन्स अपहरण, सुवर्ण चतुष्कोन योजना, NHDP योजना, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, सर्व शिक्षा अभियान, नविन टेलीकॉम निती, टफ्स योजना, ग्रामोदय योजना, संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना, अंत्योदय अन्न योजना, गृहनिर्माण योजना, वयोवृध्दांना पेन्शन योजना, शेतकऱ्यांसाठी क्रेडिट कार्ड योजना, केंद्रीय विद्युत विनियामक आयोग, चांद्रयान -१ मोहिमेची सुरूवात, विविध समित्याची स्थापना इत्यादी योगदानाचा अभ्यास करण्यासाठी दुय्यम साधनाचा वापर करण्यात आला. अटलबिहारी वाजपेयी यांच्या योगदानाचे वर्णनात्मक पध्दतीने वर्णन करण्यात आले. वाजपेयींच्या कार्यामुळे आर्थिक सुधारणा घडून आली. परराष्ट्र धोरण सुधारले. विज्ञान तंत्रज्ञानात प्रगती झाली. पायाभूत सुविधात वाढ होण्यास मदत झाली. वाजपेयींचे योगदान राष्ट्र उभारणीस, देशविकासास पूरक होते.

**मुख्य शब्द :-** अटलबिहारी वाजपेयी, योगदान, अभ्यास.

**प्रस्तावना :**

अटलबिहारी वाजपेयींनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघात प्रवेश करून कारकिर्दीची सुरूवात केली. ब्रिटीशांविरोधी छोडो भारत लढ्यात सक्रिय राहिले. भारतीय जनसंघात काम करू लागले. ६ एप्रिल १९८० ला भारतीय जनता पार्टीची स्थापना केली. भारतीय जनता पार्टीला कमळ हे चिन्ह मिळाले. बीड जिल्ह्यातील प्रमोद महाजन, गोपीनाथ मुंडे यांनी भारतीय जनता पार्टीचे काम निष्ठेने केले. प्रमोद महाजन म्हणजे गोपीनाथ मुंडे चे मेहुणे होतं. भारतीय जनता पार्टीला कमळ हे चिन्ह मिळाल्यामुळे प्रमोद महाजन तसेच कुटूंबियांनी अशी इच्छा व्यक्त केली की, गोपीनाथरावांना मुलगा झाला तर पंकज असे नाव ठेवायचं आणि मुलगी झाली तर पंकजा. गोपीनाथरावांना कन्यारत्न झाले आणि तिचे नामकरण पंकजा असे करण्यात आले. १९८४ मध्ये भारतीय जनता पार्टीचे निवडणुकीमध्ये केवळ दोन सदस्य निवडून आले. वाजपेयींनी प्रखर तपस्या केली. नेतृत्वगुण, संवाद कौशल्य, प्रभावी वक्तृत्वशैली, केलेले योगदान यातून जनतेची मने जिंकली. भारतीय जनता पार्टीचे पहिले अध्यक्ष बनल्यानंतर मुंबई येथील अधिवेशनातून 'अंधेरा छटेगा, सूरज निकलेगा, कमल खिलेगा' ही घोषणा केली. वाजपेयींच्या अखंड परिश्रमाने, जिद्दीने त्यांच्या कार्यामुळे कमळ उमलले. वाजपेयींनी पंतप्रधान पदी असताना अनेक अभ्यासपूर्ण निर्णय घेतले. वाजपेयींनी केलेल्या भरीव कार्यामुळे देशविकासाला हातभार लागला.परमाणू परीक्षण विस्फोट पोखरण II, राजस्थान यामुळे भारत अण्वस्त्रदृष्ट्या संपंन्न बनला असल्याचे घोषित केले. अमेरिका, कॅनडा सारख्या काही विकसित देशाने काही निर्बंध लादले तरी त्याचा फारसा परिणाम झाला नाही कारण पुढील संकेत ओळखून वाजपेयींनी आर्थिक धोरणे अगोदरच ठरविली होती. रशिया व फ्रान्स देशाने भारताने परमाणू परीक्षण विस्फोट स्वयंरक्षणासाठी आणि शांततापूर्ण उपयोगासाठी असल्याचे समर्थन केले. वाजपेयींनी परराष्ट्र संबंध सुधारणावर भर दिला. भारत -पाकिस्तान संबंध सुधारण्याच्या हेतूने दिल्ली ते लाहोर बससेवा सुध्दा सुरू केली. कारगिल युध्दात आंतरराष्ट्रीय सल्ल्याचा सन्मान करून लाईन ऑफ कंट्रोल (LOC) न ओलांडण्याच्या भारतीय सैन्यांना सूचना दिल्या. धैर्यपूर्वक निर्णय घेऊन ठोस कार्यवाही करून कारगिल या भारतीय क्षेत्राला मुक्त केले. इंडियन एअरलाईन्स IC 814 विमान हायजॅक मधील 176 प्रवाशाची सुटका केली.संसदेवरील दहशतवाद्याने केलेल्या हल्ल्याचे प्रत्युत्तर देण्यासाठी ऑपरेशन पराक्रम मोहीम राबविली. राष्ट्रीय महामार्ग विकासातील सुवर्ण चतुष्कोन योजना भारताच्या आर्थिक, औद्योगिक विकासातील मैलाचा दगड ठरला. सर्व शिक्षा अभियानातून शिक्षणाचे सार्वत्रिकरण घडवून आणले. पंतप्रधान ग्रामसडक योजनेतून दुर्गम व डोंगराळ प्रदेशातील २५० लोकसंख्या असलेल्या व सपाट भागातील ५०० लोकसंख्या असलेली गावे रस्त्याने जोडली व गावाचा विकास होण्यास मदत झाली. नवीन टेलिकॉम



नीतीमुळे संचारक्रांती घडून आली. टफ्स योजनेमुळे वस्त्रोद्योगाचे आधुनिकीकरण झाले. भारतीय कापड विदेशात पोहचू लागले. पंतप्रधान ग्रामोदय योजनेमुळे लोकांचा राहणीमानाचा दर्जा सुधारला. ग्रामीण रोजगार योजना, निर्मल भारत अभियान, अंत्योदय अन्न योजना, वाल्मिकी आंबेडकर आवास योजना, पेन्शन योजना, किसान क्रेडिट कार्ड योजना, केंद्रीय विद्युत विनियामक आयोगाची स्थापना, खाजगीकरण, चांद्रयान - १ मोहिमेची सुरूवात, मुख्यमंत्री संमेलन, उडीसा क्षेत्रात सात सुत्रीय गरीबी निमूलन कार्यक्रम, विमानतळ विकास, लेखन कार्य इत्यादी वाजपेयींनी भरीव योगदान दिले आहे. वाजपेयींच्या योगदानाचा अभ्यास यामध्ये केला आहे.

### १) जीवन परिचय :

अटलबिहारी वाजपेयी यांचा जन्म २५ डिसेंबर १९२४ मध्ये ग्वॉलेर येथे झाला. त्यांच्या वडीलांचे नांव कृष्णबिहारी वाजपेयी तर आईचे नांव कृष्णादेवी होते. कृष्णबिहारी वाजपेयी पेशाने शिक्षक होते. अटलबिहारी वाजपेयी यांचे शिक्षण सरस्वती शिशू मंदिर ग्वॉलेरला झ ााले. १९३४ मध्ये त्यांनी ए.व्ही.एम.स्कुल बारनगर जिल्हा उज्जैन येथे प्रवेश घेतला. अटलबिहारी वाजपेयी यांनी व्हिक्टोरिया कॉलेज ग्वॉलियर (आताचे लक्ष्मीबाई कॉलेज) येथून पदवीचे शिक्षण पूर्ण केले. येथेच अटलबिहारी वाजपेयी यांचा परिचय राजकुमारी कौल यांच्याशी झाला. अटलबिहारी वाजपेयी यांचे पदव्यूत्तर पदवीचे शिक्षण राज्यशास्त्र विषयामध्ये डी.ए.व्ही.कॉलेज कानपूरला पूर्ण झाले. १९४५ ला कायद्याचे शिक्षण कानपूरच्या डी.ए.व्ही.कॉलेज मध्ये झाले. यावेळी अटलबिहारी वाजपेयी व त्यांचे वडील कृष्णबिहारी वाजपेयी डी.ए.व्ही.कॉलेजमध्ये सहाध्यायी होते. अटलबिहारी वाजपेयी यांनी याबाबत लिहिले आहे.“वडील वर्गात उशिरा यायचे तेव्हा तुझे वडील कुठे बेपत्ता झाले होते ते विचार असे शिक्षक हसून म्हणायचे. मी उशिरा यायचो तेंव्हा ते वडीलांना तुमचा मुलगा कुठे बेपत्ता होता असे विचारायचे. त्यामुळे आमची अडचण होत असे. त्यामुळे मी कायद्यातील दुसरे विषय निवडले. आमची सेक्शन बदलली.” अटलबिहारी व त्यांचे वडील कृष्णबिहारी एकाच कॉलेजमधून कायद्याचे शिक्षण पूर्ण केले.

### २) राजकीय कार्यकाळ :-

अटलबिहारी वाजपेयी यांनी १९३९ मध्ये ‘राष्ट्रीय स्वयंसेवक संघ’ मध्ये प्रवेश केला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघातील बाबासाहेब आपटे यांच्या शिकवणीचा प्रभाव अटलबिहारी वाजपेयींवर होता. १९४२ च्या ‘भारत छोडो’ आंदोलनात वाजपेयी सहभागी झाले. यामध्ये त्यांना २३ दिवस कारावास झाला. शामाप्रसाद मुखर्जी यांच्या प्रभावामुळे १९५१ मध्ये भारतीय जनसंघाचे काम करू लागले. अटलबिहारी वाजपेयी भारतीय जनसंघाचा संस्थापक होते. १९५५ मध्ये पहिल्या वेळेस लोकसभा निवडणूक लढवली. यामध्ये वाजपेयींना पराभव पत्कारावा लागला. अटलबिहारी वाजपेयी हिंमत न हारता १९५७ मध्ये बलरामपूर जिल्हा गोण्डा उत्तरप्रदेश मधून लोकसभा क्षेत्रातून विजयी झाले. १९५७ मध्ये पहिल्या वेळेस संसद भवनात अटलबिहारी बैलगाडीमधून आले होते. तत्कालीन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू होते. जवाहरलाल नेहरू नवीन सदस्यांना बोलण्याची संधी देत आणि काळजीपूर्वक ऐकत. संसदेत पहिल्या वेळेस वाजपेयी यांचे भाषण ऐकूण जवाहरलाल नेहरू प्रभावित झ ााले. नेहरूंनी अटलबिहारी वाजपेयी यांना देशाचे भावी पंतप्रधान म्हटले होते. अटलबिहारी वाजपेयी संसदीय मर्यादांचे पालन करून बोलत असत. १९५७ ते १९७७ कालावधीत अटलबिहारी वाजपेयी जनसंघाचे नेते होते. तत्कालीन पंतप्रधान मोरारजी देसाई सरकारात १९७७ ते १९७९ मध्ये अटलबिहारी वाजपेयी परराष्ट्र मंत्री होते. ६ एप्रिल १९८० मध्ये भारतीय जनता पार्टीची स्थापना झाली. अटलबिहारी वाजपेयी भारतीय जनता पार्टीचे पहिले अध्यक्ष बनले.अटलबिहारी वाजपेयी भारतीय जनता पार्टीचे पहिले अध्यक्ष बनल्यानंतर भारतीय जनता पार्टीचे प्रथम राष्ट्रीय अधिवेशन मुंबईत भरले होते. ‘अंधेरा छटेगा, सूरज निकलेगा, कमल खिलेगा’ ही घोषणा वाजपेयींनी मुंबईतून केली होती.अटलबिहारी वाजपेयी राज्यसभा सदस्य दोन वेळेस आणि लोकसभा सदस्य १० वेळेस होते. वाजपेयी हे ४० वर्षे संसदेचे सदस्य राहिले. अटलबिहारी वाजपेयी १९९६ मध्ये १३ दिवसासाठी, १९९८ ते १९९९ मध्ये ११ महिन्यासाठी तर १९९९ ते २००४ या कालावधीत पंतप्रधानपदी होते.मुंबईत २००५ साली शिवाजी पार्क मधील भाषणात वाजपेयींनी कोणत्याही निवडणूकीत उभा राहणार नसल्याचे जाहीर करून राजकारणातून संन्यास घेतला.

### ३) भारतीय परमाणू परिक्षण :

अटलबिहारी वाजपेयी यांची वैज्ञानिक दृष्टीकोन आणि विज्ञानाला प्रोत्साहन देण्याची भूमिका होती. पुणे येथे भरलेल्या सायन्स कॉंग्रेस मध्ये ‘जय जवान, जय किसन, जय विज्ञान’ ही घोषणा त्यांनी दिली. वाजपेयी सायन्स कॉंग्रेस संपल्यानंतर डॉ.रघूनाथ माशेलकरांना म्हणाले, “अणूचाचणी झाल्यावर अमेरिका लगेच तंत्रज्ञानावर निर्बंध लादतील याचा तुम्हा शास्त्रज्ञावर काय परिणाम होईल ?” ह्यावर रघूनाथ माशेलकर उत्तरले, “सर, अमेरिकेने काहीही निर्बंध घालू देत, जोपर्यंत आम्ही शास्त्रज्ञ आमच्या मेंदूवर निर्बंध घालत नाही. तोपर्यंत अमेरिका आपल काही बिघवू शकत नाही.” वाजपेयी माशेलकरांचा हात हातात घेऊन म्हटले, “शाब्बास, माशेलकरजी याच भावनेने आणि ऊर्जेने तुम्ही काम केलंत तर भारताला काहीच चिंता नाही.”११ ते १३ मे १९९८ ला पोखरण, II राजस्थान मध्ये ५ भूमिगत परमाणू विस्फोट करून भारताला परमाणू

शक्ति संपन्न देश घोषित केला. परमाणू परीक्षण एवढे गोपनीय होते की, अतिविकसित जासूसी उपग्रह व तंत्रज्ञानाने संपन्न पश्चिमी देशांना याची भनकसुध्दा लागली नाही. अपेक्षेप्रमाणे अमेरिका, कॅनडा, जपान, इंग्लंड, युरोपीय महासंघाने भारताच्या या परमाणू परीक्षण चाचणीचा विरोध दर्शवून भारतावर अनेक निर्बंध लादले. वाजपेयीच्या आर्थिक धोरणामुळे भारताला याचा फारसा फटका बसला नाही. रशिया व फ्रान्स देशाने भारताने स्वयंरक्षणासाठी आणि शांततापूर्ण उपयोगासाठी घेतलेल्या अणूचाचण्याचे समर्थन केले.

### ४) दिल्ली ते लाहोर दरम्यान सदा - ए - सरहद बससेवा :

भारताच्या शेजारील पाकिस्तान देशाबरोबरचे संबंध सुधारण्यासाठी अटलबिहारी वाजपेयींनी दिल्ली ते लाहोर दरम्यान ‘सदा - ए - सरहद’ बससेवा १९ फेब्रुवारी १९९९ ला सुरू केली. प्रवाशीच्या स्वरूपात वाजपेयींनी प्रवास केला. त्यांच्यासोबत देव आनंद, जावेद अख्तर, कपिल देव, मल्लीका साराभाई हेही होते. अटलबिहारी वाजपेयींनी नवाज शरीफशी मुलाखत करून आपली संबंध सुधाराची नवी सुरूवात केली. पाकिस्तानचे फझिल जामिली सांगतात, “लाहोर येथे सत्कार समारंभात वाजपेयींनी ‘अब जंग नही होने देंगे हम’ सा कवितेचे वाचन केले.” भारत पाकिस्तान शांतता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने वाजपेयींनी पहिले पाऊल उचलले होते.

### 5) कारागिल युध्द :

वाजपेयी पाकिस्तानमध्ये ‘जंग नही होने देंगे हम’ ही कविता वाचत असतानाच पाकिस्तानचे तत्कालीन लष्करप्रमुख परवेझ मुशर्रफ यांनी कारगिलच्या पर्वतावर जंग ची तयारी सुरू केली होती. पाकिस्तानने भारताच्या सीमाभागात सैन्य घुसवले. पाकिस्तानी सैनिकांना घुसपेठ करून काही पहाडीच्या टोकावर कब्जा केला. पाकिस्तानी सैनिकांना हुसकाविण्यासाठी भारतीय सैनिकाने ‘ऑपरेशन विजय’ ही मोहीम 26 मे 1999 ला सुरू केली. अटलबिहारी वाजपेयी यांची भारतीय सैन्याला ‘लाइन ऑफ कंट्रोल’ न ओलांडण्याचा स्पष्ट सुचना होती. 18 हजार फूट उंचीवर हे युध्द सुरू होते. यामध्ये भारताचे 527 जवान शहीद झाले. 1300 पेक्षा जास्त जवान शहीद झाले.26 जुलै 1999 ला कारगिल पहाडीवर भारताचा तिरंगा फडकविला. वाजपेयी सरकारने आंतरराष्ट्रीय सल्ल्याचा सन्मान करत धैर्यपूर्वक निर्णय घेऊन ठोस कार्यवाही करत भारतीय क्षेत्राला मुक्त केले.

### ६) इंडियन एयरलाईन्स - विमान अपहरण - १७६ प्रवाशांची सुटका

डिसेंबर १९९९ मध्ये नेपाळमधील काठमांडू येथून दिल्लीला येत असलेल्या इंडिया एअरलाईन्स विमान IC814 चे अपहरण 5 दहशतवाद्याने केले. या विमानात 176 प्रवाशी प्रवास करत होते. अपहरण कर्त्याकडून काही डिमांड करण्यात आल्या. भारतीय तुरूंगातील 3 दहशतवादी मसूद अझहर, अमेर सईद शेख, मुस्ताक अहमद याची सुटका करावी. वाजपेयी सरकारचे परराष्ट्रमंत्री जयवंतसिंह यांनी 3 दहशतवाद्यांना घेऊन अफगानिस्तान मधील कंदाहार येथे गेले. या 3 दहशतवाद्याची सुटका करण्यात आली. त्याबदल्यात 31 डिसेंबर 1999 ला प्रवाशांची सुटका करण्यात आली.

### ७) संसदेवर दहशतवादी हल्ला - ऑपरेशन पराक्रम :

इंडियन एअरलाईन्सचे चे अपहरण झालेले विमान IC814 सोडविण्यासाठी कश्मीरच्या तुरूंगातून सोडण्यात आलेल्या दहशतवादी मसूद अझहर ने ‘जैश - ए - मोहम्मद’ ही दहशतवादी संघटना स्थापन केली. लष्कर - ए-तोयबा आणि जैश-ए-मोहम्मद या दोन्ही दहशतवादी संघटनेने भारतीय संसद भवनावर हल्ला केला. यामध्ये 6 दिल्ली पोलीस, 2 संसद सुरक्षारक्षक, एक गार्डनर शहीद झाले. वाजपेयी सरकारने पाकिस्तान सीमेवर मोठे सैन्य तैनात केले. भारतीय लष्कराच्या या कारवाईला ‘ऑपरेशन पराक्रम’ हे नाव देण्यात आले. सिमेवरील भारतीय लष्कर नंतर मागे फिरले. कारण लाखो सैनिक सीमेवर तैनात करण्यासाठी 8300 कोटी रूपयाचा खर्च झाला.

### 8) वाजपेयीचे परराष्ट्र धोरण :

परराष्ट्र धोरण वाजपेयींचा सुरूवातीपासूनच आवडीचा विषय होता. पाकिस्तान बरोबरचे संबंध सुधारण्याचा वाजपेयींनी प्रयत्न केला. यासाठी दिल्ली लाहोर बससेवा सुरू केली. कारगिल युध्द प्रसंगी अमेरिकेची मध्यस्थी वाजपेयींनी स्वीकारली. भारत - अमेरिका संबंधात सुधारणा होण्यास क्लिंटन यांच्या कारकिर्दित सुरूवात झाली. अमेरिकेच्या वर्ल्ड ट्रेड सेंटर आणि पेंण्टॅगॉन वरील दहशतवादी हल्ला यामुळे जॉर्ज बुशच्या कुटनीतीच्या शैलीत बदल झाला. भारतीय संसदेवरील हल्ल्यानंतर लष्कर - ए- तोयबा आणि जैश-ए-मोहम्मद या दहशतवादी संघटना असल्याचे अमेरिकेने मान्य केले. भारताविरूध्दचे निर्बंध अमेरिकेने हटवून व्यापार व सहकार्य वाढीस सुरूवात झाली. सोव्हियत युनियनच्या विघटनानंतर नवीन रशियाबाबत वाजपेयींचे धोरण मैत्रीपूर्ण राहिले. भारत - चीन सीमा तंटा सुटण्याच्या दृष्टीने वाजपेयींनी विशेष प्रयत्न केल्याचे दिसत नाही.भारत - बांग्लादेश यांच्यात गंगा पाणी वाटप, दळणवळण व्यापार क्षेत्रात संबंध सुधारली. कुमारतुंगा यांच्या भारत भेटीत

श्रीलंकेच्या सार्वभौमत्व व प्रादेशिक एकात्मतेसाठी भारत प्रयत्न करणार असल्याचे वाजपेयींनी स्पष्ट केले. भारताचे नेपाळसोबत सुरूवातीपासूनच चांगले संबंध राहिले आहेत. वाजपेयींनी शिक्षण व ग्रामीण विकास योजनेसाठी नेपाळला 48 कोटी रू. मदत केली. वाजपेयींनी सार्क देशाची एक मुक्त बाजारपेठ तयार व्हावी या दृष्टीने सामुदायिक व द्विपक्षीय पध्दतीने प्रयत्न केले.

### 9) नॅशनल हायवे डेव्हलपमेंट प्रोजेक्ट :

फिक्कीच्या वार्षिक सभेत NHDP संकल्पना वाजपेयींनी मान्य केली. 24 ऑक्टोंबर 1998 ला भाषणात NHDP ची घोषणा केली. NHDP प्रोग्राम साध्य करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे यासाठी जमा झालेला उपकर व्यपगत न होणाऱ्या निधीत जमा करणे. भविष्यकालीन तजवीज म्हणून रोखे प्रस्तृत करणे.भारताच्या संकलित निधीबरोबर व्यपगत न होणाऱ्या निधीबाबत अर्थखात्याचे पारंपारिक ज्ञान नाकारण्याची गरज होती. वाजपेयींनी हे आनंदाने केले. यामुळे NHDP मोठ्या प्रमाणात कर्जे उभे करू शकले.वाजपेयींनी नॅशनल हायवे डेव्हलपमेंट प्रोजेक्ट 1998 ला सुरू केला. या प्रकल्पाचे व्यवस्थापन नॅशनल हायवे अथॉरिटी ऑफ इंडिया (NHAI)करते. NHDP 49260 कि.मी. लांबीचा प्रकल्प असून यामुळे देशाचा आर्थिक विकास मोठ्या प्रमाणात झाला. राष्ट्रीय महामार्ग भारतात 2% असून यावरून देशाची 40% वाहतूक होते.

### फेज - 1 सुवर्ण चतुष्कोन योजना

अटलबिहारी वाजपेयी यांनी 2001 मध्ये सुवर्ण चतुष्कोन योजना सुरू केली. भारतातील सर्वात मोठी राजमार्ग योजना आहे. दिल्ली, मुंबई, चेन्नई आणि कोलकत्ता या चार महानगरांना जोडणारी 5846 किलो मीटर लांबीची ही राजमार्ग योजना आहे. दिल्ली, मुंबई, चेन्नई, कोलकत्ता, अहमदाबाद, बेंगलुरू, भुवनेश्वर, जयपूर, कानपूर, पुणे, सुरत, गुंटूर, विजयवाडा, विशाखापट्टनम या प्रमुख शहरावरून हा महामार्ग जातो. सुवर्ण चतुष्कोन योजनेसाठी रू.600 बिलीयन खर्च करण्यात आला. सुवर्ण चतुष्कोन राजमार्ग योजना 2012 मध्ये पूर्ण झाली. सुवर्ण चतुष्कोन माहामार्गामुळे देशाचा आर्थिक, औद्योगिक, सामाजिक, सांस्कृतिक विकास होण्यास मदत होत आहे.

### फेज -2 उत्तर - दक्षिण व पूर्व - पश्चिम कॉरिडॉर

उत्तरेकडील श्रीनगर ते दक्षिणेकडील कन्याकुमारी, पुर्वेकडील सिलचेर ते पश्चिमेकडील पोरबंदर असा 7142 किमी चा राष्ट्रीय महामार्ग बनविला. 31 ऑक्टोंबर 206 पर्यंत 90.99% काम पूर्ण झाले होते.

सध्या NHDP च्या फेज III -11809 km, फेज IV-3203 km, फेज V-6500 km असून 31 मार्च 2018 अखेर 13373 km लांबीचा राष्ट्रीय महामार्ग बनविणे राहिला होता.

### 9) पंतप्रधान ग्रामसडक योजना

अटलबिहारी वाजपेयी यानी दि.25 डिसेंबर 2000 मध्ये पंतप्रधान ग्रामसडक योजना कार्यान्वित केली. सपाट भागातील 500 लोकसंख्येची गावे, डोंगराळ व दुर्गम भागातील 250 लोकसंख्येची गावे रस्त्यानी जोडण्याचा उद्देश होता. गाव रस्त्यानी जोडल्यामुळे गावातील जनतेचे जीवनमान सुधारले. मार्च 2019 अखेर 100% गावे जोडण्याची मानस आहे.

### 10) सर्व शिक्षा अभियान

अटलबिहारी वाजपेयींनी 2000 - 2001 मध्ये सर्व शिक्षा अभियान सुरू केले. SSA ची अंमलबजावणी 2002 पासून भारतभर झ ाली. राज्यघटनेमध्ये 86 वी घटनादुरूस्ती 2002 मध्ये करण्यात येऊन कलम 21-अ नुसार 6 ते 14 वयोगटातील बालकांना प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्यात आले. 2000 मध्ये 40% बालक गळतीचे होते. 2005 साली गळतीचे प्रमाण 10% झाले. सर्व शिक्षा अभियानामुळे गळतीचे प्रमाण कमी झाले.भौतिक सुधारणा, नवीन वर्गखोल्यांचे बांधकाम, शैक्षणिक साहित्य वाटप, विद्यार्थी उपस्थिती वाढविण्यासाठी उपस्थिती भत्ता, मोफत गणवेश वाटप योजना, गरजूंना सायकल वाटप इत्यादी योजना सुरू करण्यात आल्या. यामुळे प्राथमिक शिक्षणाचे मोठ्या प्रमाणात सार्वत्रिकरण घडून आले. गळती व स्थगितीचे प्रमाण कमी झाले. बालकांना दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळत आहे.

### 11) नवीन टेलिकॉम निती :

अटलबिहारी वाजपेयींनी 1999 मध्ये BSNL सोबत एकाधिकार समाप्त करून नवीन टेलिकॉम निती लागू केली. लायसेंस फी रद्द करून त्या ठिकाणी सरकारने टेलिकॉम कंपन्यात असलेली फिक्स रेव्हेनू शेअरींग यंत्रणा आंमलात आणली. लायसेंस फी मध्ये दरवर्षी कंपन्यांना नेटवर्क लायसेंस विकत घ्यावे लागायचे. रेव्हन्यू शेअरींग व्यवस्थेमध्ये कंपन्या प्रतिवर्षी रेव्हेन्यू मधून 15% देतात. याचा फायदा असा झाला की कंपन्याने कॉलरेट कमी केले. त्यामुळे भारतामध्ये फोन कॉल्सचा वापर वाढला. भारतीय अर्थव्यवस्थेला नवीन दिशा मिळाली.

भारत देशात संचार क्रांती घडून आली. टेलिकॉम सेक्टरमध्ये होणारे वाद सोडविण्यासाठी 29 मे 2000 रोजी टेलिकॉम डिस्प्यूट सेटलमेंट अपोले ट्रिब्यूनल (TDSAT) ची स्थापना केली.

**12) टफ्स योजना -**

वाजपेयींनी 1999 मध्ये सुरू केलेल्या टफ्स योजनेमुळे वस्त्रोद्योगाचे आधुनिकीकरण झाले. टफ्स योजनेतून नवी यंत्रसामुग्री खरेदीसाठी 20% अनुदान देण्यात आले. कर्जावरील व्याजाला 5% सवलत देण्यात आली. पुढे यंत्रसामग्री खरेदीवरील अनुदान 30% करण्यात आले. सूतनिर्मिपासून ते कापडनिर्मितीपर्यंत सुधारणा होऊन दर्जेदार कापडाची निर्मिती झाली. कापड विदेशात पोहचून परकीय चलन मिळू लागले. देशांतर्गत वस्त्रोद्योगाला चालना मिळाली.

**13) प्रधानमंत्री ग्रामोदय योजना - 2000-2001 :**

ग्रामीण विकास करण्यासाठी ग्रामीण क्षेत्रात आरोग्य, शिक्षण, पेयजल, गृहनिर्माण, ग्रामीण विद्युतकरण या संबंधी विकासासाठी ही योजना कार्यान्वित करण्यात आली. शिक्षण व आरोग्य क्षेत्रात प्रगती झाली. लोकांच्या राहणीमानाच्या दर्जात सुधारणा झाली.

**14) संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना - 5 सप्टेंबर 2001 :**

ग्रामीण क्षेत्रात रोजगारांच्या संधी उपलब्ध करून देणे, अन्न व अन्नधान्य सुरू करण्यात आली.SGRY मुळे लोकांना रोजगार मिळला.नागरिकांच्या दैनंदिन गरजा भागविण्यास मदत झाली.

**15) निर्मल भारत अभियान :**

मोकळ्या ठिकाणी शौचास जाण्याच्या प्रथेस आळा घालून शौचालय बांधण्यावर भर देण्यात आला.स्वच्छता व जीवनमान सुधारण्यावर भर देण्यात आला.

**16) अंत्योदय अन्न योजना - 25 डिसेंबर 2000 :**

गरीबातल्या गरीब कुटूंबाना दरमहा 25 किलोग्रॅम अन्नधान्य पुरवठा, 2 रू किलो गहू व 2 रू. किलो तांदूळ या भावाने देण्याची योजना सुरू करण्यात आली. गरीबांना स्वस्त अन्न धान्य मिळू लागले.

**17) वाल्मिकी आंबेडकर आवास योजना - सप्टेंबर 2001**

शहरी झोपडपट्टीतील लोकांसाठी गृहनिर्माण योजना सुरू केली.

**18) पेन्शन योजना :-**

ग्रामीण भागांतील गरीब वयोवृध्द लोकांना पेन्शन योजना सुरू केली. पेन्शन योजनेचा कष्टकरी शेतमजूर, तसेच असंघटीत क्षेत्रामधील कामगार वर्गाला झाला.

**19) इंधनात इथेनॉल मिसळण्याचा निर्णय :**

ऊस उत्पादकाचे प्रश्न समजावून घेतले. इंधनात इथेनॉल मिसळण्याचा निर्णय वाजपेयींनी घेतला. इंधनात सद्या 5% इथेनॉल मिसळले जाते.

**20) किसान क्रेडीट कार्ड - ऑगस्ट 1998**

किसान क्रेडिट कार्डवर भर दिला. ही योजना NABARD ने तयार केली असून R.V. गुप्ता कमिटीने शिफारस केली. शेतकऱ्यांना शेतीविषयक गरजामध्ये सवलतीच्या दरात कर्ज पुरवठा होऊ लागला.

**21) खाजगीकरण :**

वाजपेयी सरकारने व्यापार व उद्योगातील हस्तक्षेप कमी केला. भारत अल्युमिनियम कंपनी (BALCO) Hindustan Zinc, Indian Petrochemical corporation limited and vsnl कंपनीतर्फे निर्गूतवणूक करून खाजगीकरणास प्राधान्य दिले. Rening in the fiscal profligacy fiscal Responsibility act.यामुळे बचतीचे प्रमाणात वाढ झाली. 2000 मध्ये GDP च्या 0.8% वरून 2005 मध्ये 2.3% वर गेले.

**22) चांद्रयान -1**

अटलबिहारी वाजपेयींनी 15 ऑगस्ट 2003 मध्ये चांद्रयान - 1 मोहीमेची घोषणा केली. भारतीय अवकाश संशोधन संस्थेद्वारे चांद्रयान मोहीम राबविली. चांद्रयान- 1 मोहिमेवर अटलबिहारी वाजपेयींनी स्वाक्षरी करून चांद्रयान - 1 मोहिमेची सुरूवात केली.

**23) केंद्रीय विद्यूत विनियामक आयोग स्थापन :**

विद्युत निर्मिती कंपनीचे प्रशुल्क नियमन, विद्युत उत्पादन व विक्रीसाठी संयुक्त योजना, राज्यीय पारेषण विनिमय, आंतरराष्ट्रीय पारेषण आणि व्यापारासाठी लायसन्स देणे, राष्ट्रीय विद्युत निधी आणि प्रशुल्क निती तयार करणे. या उद्देशासाठी केंद्रीय विद्युत विनियामक आयोगाची भारताचे विद्युत अधिनियम 2003 अन्वये स्थापना करण्यात आली.

**24) विविध समित्याची स्थापना :-**

वाजपेयी सरकारने राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार समिती 19 नाव्हेंबर 1998 मध्ये स्थापन केली. आर्थिक विकास होण्यासाठी आर्थिक सल्लागार समिती स्थापन केली. परकीय व्यापारास चालना मिळावी. उद्योगात भरभराट व्हावी या दृष्टीने व्यापार एवं उद्योग समितीची स्थापना केली.

**25) अन्य कार्ये :-**

उपभोक्ता सामग्री किंमत नियंत्रणासाठी मुख्यमंत्री संमेलन घेतले. उडिसा क्षेत्रात - सात सुत्रीय गरीबी निर्मुलन कार्यक्रम सुरू केला. गृहनिर्माणसाठी अर्बन सिलिंग ॲक्ट समाप्त केला.NRI साठी - विमा योजना सुरू केली. रोझा इफ्तार,राष्ट्रीय महामार्ग विकास,विमानतळ विकास,इत्यादी योजना यशस्वीपणे राबवून देशविकास घडवून आणला.

**26) लेखनकार्य Prose -**

National Integration (1961),New Dimensions of indian foreign policy (1971) ,गठ बंधन की राजनिती,Kuch lekha, kuch bhashna (1996),बिंदू बिंदू विचार (1997),Desisive days (1999),संकल्प काल (1999),Indias Persepective on aseal and the asia - pacific regian (2003),Na Dainyam na palayanam,नई चुनौती : नया अवसर

**विता -** कैदी कविराज की कुण्डलियाँ,अमर आग है (1994) मेरी इक्यावन कविताएँ, क्या खोया क्या पाया : अटलबिहारी वाजपेयी, व्यक्तित्व और कविताएँ (1999),Values, vision & verses of vajpayee indias man of destiny (2001),Twenty one poems चुनी हुई कविताएँ (2012)

**प्राप्त पुरस्कार :** पद्मविभुषण 1992, डी लिट कानपूर विश्वविद्यालय (1993),लोकमान्य टिळक पुरस्कार (1994),श्रेष्ठ सांसद पुरस्कार (1994),पंडीत गोविंद वल्लभपंत पुरस्कार (1994),डी लिट मध्यप्रदेश भोज मुक्त विश्वविद्यालय (2015),फेंडस ऑफ बांग्लादेश लिबरेशन वार अवॉर्ड (बांग्लादेश सरकार द्वारा प्रदत्त)-2015,भारतरत्न 2015

**निष्कर्ष :-**

अटल बिहारी वाजपेयी यांच्या योगदानामुळे लोकशाही सुदृढ झाली. वैज्ञानिक दृष्टीकोन वाढीस लागला. परमाणू परीक्षण विस्फोट पोखरण II, राजस्थान येथे पाच भूमिगत विस्फोट 11 व 13 मे 1998 ला घडवून आणले. भारताने अण्वस्त्र दृष्ट्या स्वयंपूर्ण घोषित केले. वाजपेंयीच्या नियोजित आर्थिक धोरणांमुळे अतिविकसित देशांनी टाकलेल्या निर्बंधाचा भारताला फारसा फटका बसला नाही. रशिया व फ्रान्स सारख्या देशाने भारताने स्वसंरक्षणासाठी व शांततापूर्ण उपयोगासाठी घेतलेल्या, अणुचाचण्याचे समर्थन केले. भारत - पाक संबंध सुधारण्यासाठी लाहोर ते दिल्ली सदा - ए - सरहद बससेवा सुरू केली. परंतु पाकिस्तानी लष्करप्रमुख परवेझ मुशर्रक व उग्रवादी संघटनांनी भारतातील कारगिल भागात घुसपेठ केली. वाजपेयींनी आंतरराष्ट्रीय सल्ल्याचा आदर करून LOC पार न करता भारताचा कारगिल भाग मुक्त केला. पाच दहशतवाद्याने इंडियन एअर लाईन्स विमान IC 814 चे अपहरण केले.या विमानातील 176 प्रवाशांची यशस्वी सुटका केली. वाजपेयींचा परराष्ट्र धोरण हा आवडता विषय होता. शेजारील देशाच्या संबंध सुधारणावर वाजपेयींनी भर दिला. वाजपेयींनी सार्क देशाची मुक्त बाजारपेठ होण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले. दिल्ली, मुंबई, चेन्नई आणि कोलकत्ता या चार महानगरांना जोडणारी सुवर्ण चतुष्कोन 5846 किमी लांबीची योजना तयार केली. NHDP योजना तसेच सपाट भागातील 500 लोकसंख्येची गावे व डोंगराळ भागातील 250 लोकसंख्येची गावे जोडणारी पंतप्रधान ग्रामसडक योजना राबवून सर्व गावे रस्त्याने जोडली. प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण, भौतिक सुविधांची निर्मिती,

विद्यार्थ्यांचे गळती व स्थगितीचे प्रमाण कमी करण्याच्या दृष्टीने सर्व शिक्षा अभियान सुरू केले. त्यामुळे बालकांना दर्जेदार व गुणवत्तापुर्ण शिक्षण मिळण्यास मदत झाली. वाजपेयींनी नविन टेलिकॉम निती केल्यामुळे भारतात संचारक्रांती घडून भारतीय अर्थव्यवस्थेला नवीन दिशा मिळाली. वस्त्रौद्योगात आधुनिकरण करण्याच्या दृष्टीने टफस योजना लागू केली. ग्रामीण क्षेत्रात आरोग्य, शिक्षण, पेयजल, गृहनिर्माण, पोषण, ग्रामीण विद्युतकरण विकासासाठी प्रधानमंत्री ग्रामोदय योजना सुरू केली. संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेच्या माध्यमातून ग्रामीण क्षेत्रात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या.स्वच्छता व जीवनमान सुधारण्यासाठी निर्मल भारत अभियान सुरू केले. गरीबातल्या गरीबांना अंत्योदय अन्न योजना सुरू केली. शहरी झोपडपट्टीतील लोकांना वाल्मिकी आंबेडकर आवास योजनेच्या माध्यमातून घरे उपलब्ध करून दिली. वाजपेयींनी ग्रामीण भागातील वयोवृध्द लोकांना पेन्शन दिली. इंधनात इथेनॉल मिसळण्याचा निर्णय घेण्यात आला. शेतकऱ्यांना शेतीविषयक गरजांमध्ये सवलतीच्या दरात कर्जपुरवठा करण्याच्या दृष्टीने किसान क्रेडिट कार्ड योजना सुरू केली. केंद्रीय विद्युत विनियामक आयोग स्थापन केला. वाजपेयींनी व्यापार व उद्योगातील सरकारी हस्तक्षेप कमी करून खाजगीकरण घडवून आणले. चांद्रयान - 1 मोहिमेची घोषणा केली. राष्ट्रीय सल्लागार समिती, आर्थिक सल्लागार समिती व्यापार एवं उद्योग समितीची स्थापना केली. त्याचप्रमाणे वाजपेयींने उपभोक्ता सामग्री किंमत नियंत्रणासाठी मुख्यमंत्री संमेलन घेतले. उडिसा क्षेत्रात सात सुत्रीय गरीबी निर्मुलन कार्यक्रम सुरू केला. गृहनिर्माणासाठी अर्बन सिलिंग ॲक्ट समाप्त केला. NRI साठी विमा योजना सुरू केली. रोझा इफ्तार, विमानतळ विकास राष्ट्रीय महामार्ग विकास आदि कार्ये केली. वाजपेयींनी आर्थिक समृध्दता, विज्ञान तंत्रज्ञानात प्रगती पायाभूत सुविधांची उपलब्धता इत्यादी माध्यमातून राष्ट्रउभारणीस, देशविकासास योगदान दिले.

**संदर्भ सुची :-**


1) Kingshuk Nag, Atalbhihari Vajpayee A man for all season, rupa publication, new delhi (2016)
2) Bhagwat S. Goyal, values, vision & verses of vajpayee; Indias man of destiny srujan publication gaziabad (2001)
3) Sita Ram Sharma, prime minister Atalbhihari Vajpayee, the BJP Era (1999)
4) bbc.hindi.com date. 14/08/2007
5) Sudhir Chaudhari daily news and analysis zee news tv. date.16/08/2018
6) Rai, Ajai K, Indias Nuclear deplomacy after pokharan II
7) Pearson Education India, (2009)
8) Chandrika Prasad Sharma, Poet Politicion Atalbihari Vajpayee: A Biography (1998)
9) सुवर्णा भाऊसाहेब पाटील, भारताचे परराष्ट्र धोरण अटलबिहारी वाजपेयी यांचा काळ, संशोधन प्रबंध BAMU विद्यापीठ औरंगाबाद, जून 2010
10) सुजाता के.दास, अटलबिारी वाजपेयी (2004)
11) विकीपिडीया - अटलबिहारी वाजपेयी




**श्री. राजकुमार तुकाराम राठोड**
**सहशिक्षक एम.ए.एम.एड् सेट (शिक्षणशास्त्र) जि.प.प्रा.शा.लऊळ क्र.१ ता.माजलगाव जि.बीड महाराष्ट्र.**